## नि.क्र. ४९ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्या विरुद्ध या अर्जावरती विनाम्हणणे आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी अर्जावरती म्हणणे दाखल करुन या अर्जास हरकत नोंदविली आहे.

३. वादी विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीचा कब्जा व नुकसानीचे भाडे प्रतिवादीकडून मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये वादीचे कथन असे की, सि.स.नं. ४५१/१/अ, ४५१/१/ब, ४५१/क क्षेत्रफळ २७५.९० चौमी ही संपूर्ण जागा वादी क्र. १ ते ३ यांचे आपसातील दिनांक ३०/०३/२०२१ रोजीचे रजिस्टर्ड वाटणीप्रमाणे वादी क्र. १ यांचे हिश्श्यास आली आहे. त्याची नोंद फेरफार क्र. १८८७० प्रमाणे झालेली आहे. सिटी सर्वेच्या रेकॉर्डची वादी क्र. २, ३ चे नाव नोंद कमी झालेली आहे. दाव्याचे सरनाम्यामध्ये दाव्यातील कलम २ चे पुढे २–अ मध्ये त्या अनुषंगाने दावा दुरुस्ती करणे व वादी क्र. २ धनंजय माधवराव बुडूख व वादी क्र. ३ रविंद्र माधवराव बुडूख यांचे नावे दाव्यातील सरनाम्यातून कंस करुन कमी करणे. तसेच दाव्यात कलम १ मधील ६ खोल्याऐवजी दोन खोल्या पश्चिम उत्तर बाजूस व दक्षिणेस एक संडास बाथरुम अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती साधारण स्वरुपाची आहे. दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होत नाही. सबब वरीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती वादीने केली आहे.

५. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, दावा हा दावा मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत वादी मागणी करीत असलेली दुरुस्तीची गरज नजरचुकीने निर्माण झाली असून ती दाव्याच्या या टप्प्यावर मंजूर करणेस कायदेशीर बाधा नाही. दुरुस्ती केल्यास दावा गुणदोषावर निर्णायक करण्यास सहाय्य होणार आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती मंजूर करणे उचित होईल.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे पक्षकार दाव्याच्या कोणत्याही

टप्प्यावर वादपत्रामध्ये दावा निर्णायक करण्याकरीता आवश्यक ती असलेली दुरुस्ती करु शकतात. वादीची दाव्यातील मागणी ध्यानात घेता सदर दुरुस्ती दावा गुणदोषावर निर्णायक करण्याकरीता आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीच्या हितास कोणताही बाध निर्माण होत नाही. तसेच सदर दुरुस्ती मंजूर करण्यास कोणताही कायदेशीर बाध असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे उभयपक्षातील वाद कायमस्वरुपी संपविण्याकरिता तसेच प्रकरणांचे अनेकीकरण रोखण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे जरुरीचे आहे. सदर अर्ज मंजूर केल्याने दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट दोन्ही पक्षांचे दावा मिळकतीतील हक्क व हितसंबंध निर्णायक करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप त्यातील मागणी व प्रस्तुत अर्जातील वादी मागणी करत असलेली दुरुस्ती ध्यानात घेता न्यायाचे हित जोपासण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित होईल. अशा परिस्थितीत सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे एकंदरीत सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादींना द्यावी.

सही/–
(श्रीमती रेवती पी. बागडे)
दिनांक – १०/०६/२०२६. ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. Revati P. Bagade, 4th Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 10/06/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 10/06/2026 |